हा आजूबाजूला आवाजांचा गदारोळ
नि धावपळीच्या पट्ट्यावर गर्दीगर्दीने,
उष्ण वारे, अति शीतवारे
त्राग्याने इतस्ततः केलेले हातवारे

आपण विसरूनच गेलोत यात
आपल्याकडे आपणहून पाहण्याचे
उदाहरणार्थ, असे पाहा की
माझ्या मनात डोंगराएवढा राग
पण पटवतोय नैतिकतेने माझे
मला संयमाने शांत राहायचे आहे

शांssत. शांत!

धर्माच्या वावटळींचा धूर
जातोय नाका-तोंडात,
चुरचुरताहेत डोळे आणि
मी मला थोपटतोय क्षणोक्षणी
संयमाने शांत राहण्यासाठी

शांss त. शांत!

त्यांच्या पोटांतली ती आग
विझवू शकत नाहीये
माझ्या अणूंनी घुसमटतोय आतून,
होतोय जून

अजून …

हे पाहिले की कळते,
आणि आपण विसरूनच गेलोत
यात आपल्याकडे आपणहून पाहायचे!